**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०४ ची साक्ष**

**मी याव्दारे शपथपुर्वक निवेदन करतो की ,**

माझे नाव – योगेश चंद्रकांत शिवगण , वय – ३२ वर्षे,

व्यवसाय – इलेक्ट्रीशयन

रा. – पडेल, वारीकवाडी, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग

**शपथेवर सरतपासणी सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री. एम.जी. काळदाते यांचे मार्फत.**

०१. घटना दि.२२/०६/२०२० रोजी सकाळी ११.३० च्या दरम्यान घडली होती. आमच्या जागेत राजेश शिंदे, मिलींद शिंदे, निलेश शिंदे हे इलेक्ट्रीक पोल पुरत होते. माझे वडील चंद्रकांत शिवगण यांनी आमच्या जागेत पोल पुरु नका असे त्यांना सांगितले. ते तिघेही आम्ही इथेच पुरणार, तुला काय करायचे ते कर असे म्हणाले. माझे वडील त्यांना म्हणाले की, आम्ही पोलीस स्टेशनमध्ये जातो. तेथे रिध्दी शिंदे लोखंडी पहार घेऊन धावत आली. त्यावेळी मी घराच्या बाजूला असलेल्या आंब्याच्या बागेत होतो. रिध्दी आरोपींना म्हणाली की, चंद्रकांत शिवगण यांना मारा. रिध्दी शिंदेने ती लोखंडी पहार मिलींद शिंदे याच्या हातात दिली. निलेश याने माझ्या वडिलांना हाताने मारहाण केली. मी, माझी आई व भाऊ असे धावत वडिलांना सोडवण्यासाठी मध्ये गेलो. मिलींद शिंदे याने लोखंडी पहार माझ्या वडिलांच्या डोक्यात मारत असताना माझ्या वडिलांनी मध्ये हात घातला त्यामुळे त्यांच्या हाताला लागले. राजेश शिंदे याने माझ्या भावाला त्याच लोखंडी पहारने उजव्या हातावर मारले. माझ्या आईला रिध्दी शिंदे हिने लाकडाने मारले त्यामुळे तिच्या डाव्या खांदयाला लागले. त्यानंतर ते आम्हाला शिवीगाळ करु लागले. माझे गुप्तांग राजेश शिंदे याने दाबले. सर्वांनी आम्हाला मारण्याची धमकी दिली. त्यानंतर माझ्या वडिलांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली. घटनेतील पहार पाहल्यास मी ओळखू शकतो. मला आता जप्त मुद्देमालातील एम.ओ.नं.१ लाकडी दांडा व एम.ओ.नं.२ पहार दाखवली. ते घटनेतीलच आहे. आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकतो. आज सर्व आरोपी न्यायालयात हजर आहेत.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. डी.आर.गोरे यांचे मार्फत.</u>**

०२. हे खरे की, सर्व आरोपी एकाच कुटुंबातील व एकाच घरातील आहेत. हे खरे की, आरोपींचे घर आमच्या शेजारी आहे. हे खरे की, मला समजायला लागल्यापासून आरोपी आमच्या शेजारी राहतात. हे खरे की आरोपींच्या घराशेजारी अनंत ठुकरुल यांचे घर आहे. हे खरे की, आरोपींचे घर आमच्या मिळकतीत आहे. आरोपींच्या घरातील लाईटचे सर्विस लाईन अनंत ठुकरुल यांच्या घराला लागू नये म्हणून आरोपी खांब रोवत होते किंवा कसे हे मला माहीत नाही. हे खरे नाही की, आरोपी तेथे सपोर्ट देण्यासाठी लाकूड लावण्यासाठी खांब रोवत होते. हे खरे की, मी, माझे वडील, आई, उदय रासम यांनी आरोपींनी खांब रोवत असताना त्याठिकाणी जाऊन त्यांना मारहाण केल्याबाबतची केस आमच्याविरुध्द दाखल आहे. आरोपी रिध्दी शिंदे हिने तक्रार केली होती किंवा कसे हे मला माहीत नाही. हे खरे की, त्या केसमध्ये आरोपी क्र.४ हजर राहत नसल्याने त्याला वॉरंट काढण्यात आले आहे. हे खरे की, आरोपी क्र.४ हजर राहत नसल्याने दोन साक्षीदार झाल्यानंतर ती केस आता थांबली आहे. हे खरे की, त्या केसमधील आरोपी क्र.४ हा माझ्या सख्ख्या बहिणीचा नवरा आहे. बहीण आमच्याकडे राहते. बहीण आमच्याकडे केव्हा पासून राहते हे मला माहीत नाही. हे खरे नाही की, ती केस लांबवण्याचा माझ्या वडिलांचा वेगवेगळया माध्यमातून प्रयत्न असतो. आरोपी व माझ्या वडिलांचे वादाचे मूळ कारण हे आरोपींनी ते घर सोडून जावे हे आहे किंवा कसे हे मला माहीत नाही. मी व माझे वडील एकत्र राहतो. मी माझ्या वडिलांकडून या केसबाबत, जमिन जागेबाबत असलेल्या वादाबाबत माहिती घेतली नाही. आरोपींना त्या दिवशी जखमा झाल्या होत्या व ते दवाखान्यात गेले होते किंवा कसे हे मला माहीत नाही. हे खरे नाही की, आरोपींनी आमच्या विरुध्द केस केली म्हणून आम्ही त्यांच्या विरुध्द केस केली.

०३. हे खरे नाही की, घटना दि.२२/०६/२०२० रोजी सकाळी ११.३० च्या दरम्यान घडली होती, आमच्या जागेत राजेश शिंदे, मिलींद शिंदे, निलेश शिंदे हे इलेक्ट्रीक पोल पुरत होते, माझे वडील चंद्रकांत शिवगण यांनी आमच्या जागेत पोल पुरु नका असे त्यांना सांगितले, ते तिघेही आम्ही इथेच पुरणार, तुला काय करायचे ते कर असे म्हणाले, माझे वडील

त्यांना म्हणाले की, आम्ही पोलीस स्टेशनमध्ये जातो, तेथे रिध्दी शिंदे लोखंडी पहार घेऊन धावत आली, त्यावेळी मी घराच्या बाजूला असलेल्या आंब्याच्या बागेत होतो, रिध्दी आरोपींना म्हणाली की, चंद्रकांत शिवगण यांना मारा, रिध्दी शिंदेने ती लोखंडी पहार मिलींद शिंदे याच्या हातात दिली, निलेश याने माझ्या वडिलांना हाताने मारहाण केली, मी, माझी आई व भाऊ असे धावत वडिलांना सोडवण्यासाठी मध्ये गेलो, मिलींद शिंदे याने लोखंडी पहार माझ्या वडिलांच्या डोक्यात मारत असताना माझ्या वडिलांनी मध्ये हात घातला त्यामुळे त्यांच्या हाताला लागले, राजेश शिंदे याने माझ्या भावाला त्याच लोखंडी पहारने उजव्या हातावर मारले, माझ्या आईला रिध्दी शिंदे हिने लाकडाने मारले त्यामुळे तिच्या डाव्या खांदयाला लागले, त्यानंतर ते आम्हाला शिवीगाळ करु लागले, माझे गुप्तांग राजेश शिंदे याने दाबले, सर्वांनी आम्हाला मारण्याची धमकी दिली, हे खोटे सांगत आहे.

०४. हे खरे नाही की, आरोपींनी आम्हाला कधीही मारहाण केली नव्हती. आरोपींनी त्या मिळकतीतून बाहेर पडावे असा माझ्या वडिलांचा प्रयत्न असतो किंवा कसे याबाबत मला माहीत नाही. माझ्या वडिलांनी ग्रामपंचायत, बी.डी.ओ यांच्याकडे अर्ज दिले आहेत किंवा कसे हे मला माहीत नाही. आरोपींनी दिवाणी कोर्टात केलेला दावा की, त्यांना त्या मिळकतीतून बाहेर काढू नये हा मंजूर झाला किंवा कसे हे मला माहीत नाही. हे खरे नाही की, एम.ओ.नं.१ व २ हे घटनेतील असल्याचे खोटे सांगत आहे. हे खरे की, पहार व काठी हे प्रत्येक शेतकऱ्याच्या घरात असतात. हे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–

(श्रीमती एन.बी.घाटगे)
न्यायंडाधिकारी वर्ग–१, देवगड

दि. ११/०६/२०२५